IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** सातारा शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0046 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/01/2024 01:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 17/01/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2024
   **Time From (वेळेपासून):** 17:40 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/01/2024 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/01/2024 01:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भविष्य निर्वाह निधी पथक, माध्यमिक, जिल्हा परिषद, ता सातारा, जि सातारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सर्जेराव आनंदाराव सावंत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हल्ली रा इस्लामपुर ता वाळवा,जि सांगली,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | काळमवाडी ता वाळवा जि सांगली,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9767168631

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हेमंत विठोबा हांगे | | | 1. एनकुळ ता खटाव जिसातारा, पुसेगांव,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

6) तक्रारदार पोलीस ठाणेस आलेवर तक्रार घेवुन फिर्याद दाखल

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 18/01/2024

मी, सर्जेराव आनंदाराव सावंत वय 56 वर्षे, व्यवसाय - पर्यवेक्षक, बळवंत कॉलेज विटा ता.खानापुर जि.सांगली हल्ली रा. इस्लामपुर ता.वाळवा जि.सांगली मुळ रा. काळमवाडी ता.वाळवा जि.सांगली मोनं - 9767168631.

मी दिनांक 17/01/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सातारा येथे समक्ष हजर राहून पोलीस उप अधीक्षक श्री. राजेश वाघमारे साहेब यांची भेट घेवून माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली. त्यानंतर पोउपअधी वाघमारे साहेब यांनी पोलीस निरीक्षक सचिन राऊत यांना बोलावून माझे तक्रारीचे अनुषंगाने पुढील कारवाई करण्यास सांगितले. मी हस्ते लिहून आणलेला तक्रारी अर्ज पोनि राऊत यांचेकडे दिला. त्यानुसार मी माझेकडे लाच मागणाऱ्या लोकसेवकावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली.

त्यानुसार दिनांक 17/01/2024 रोजी माझ्या तक्रारीवरुन पोनि राऊत यांनी दोन सरकारी पंचांना बोलावून घेतले त्यानंतर पंच अॅन्टी करप्शन ब्यूरो कार्यालयात हजर झाले. तेव्हा पोनि राऊत यांनी पंचांची माझेशी व माझी पंचांशी ओळख करुन देवून पंचांना वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जि.प. सातारा येथील क्लार्क हांगे हे मला माझे सातारा जिल्हा येथे असलेले पी.एफ.चे खाते वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जि.प.सांगली येथे वर्ग करण्यासाठी 5000/- रुपये लाचेची मागणी करत असलेबाबतची माझी तक्रार थोडक्यात सांगितली.

त्यानंतर पो.नि.राऊत यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॅार्डर व सिलबंद मेमरी कार्ड मला व दोन्ही पंचांना दाखवुन त्याबाबत संपुर्ण माहीती देवुन त्यांचेकडील सिलबंद मेमरी कार्ड काढुन व्हाईस रेकॅार्डर मध्ये घातले त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला व पंच नं.1 शिंदे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन व्हाईस रेकॅार्डर सह मला व पंच नं.1 शिंदे यांना क्लार्क हांगे यांची भेट घेण्यासाठी पायी रवाना केले ती वेळ 13.15 वा ची होती. सदर वेळी सापळा पथकातील इतर लोक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात थांबुन होते. मी जिल्हा परिषद सातारा येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) कार्यालयात गेलो तेव्हा क्लार्क हांगे कार्यालयात हजर होते तेव्हा मी त्यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी मला अजुन मॅडमची सही झाली नाही थोडा वेळ बसा असे म्हणुन मला थोडा वेळ थांबण्यास सांगितल्याने मी पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात पंच नं.1 यांचेसोबत परत आलो. ती वेळ 13.41 वा ची होती.

त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला व पंच नं.1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन व्हाईस रेकॅार्डर सह मला व पंच नं.1 यांना क्लार्क हांगे यांची भेट घेण्यासाठी पायी रवाना केले ती वेळ 14.47 वा ची होती.त्यावेळी मी जिल्हा परिषद सातारा येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) कार्यालयात जावून क्लार्क हांगे यांची भेट घेवून माझ्या कामासंदर्भाने चर्चा केली तेव्हा त्यांनी मला माझे पी. एफ. खाते वेतन व भविष्य निर्वाह निधी (माध्य.)कार्यालय जि.प.सांगली कडे वर्ग करण्यासाठी तडजोडीअंती 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) कार्यालय येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली. तेव्हा मी त्यांना माझे काम रयत शिक्षण संस्थेत बाकी आहे ते करुन थोडयावेळात पैसे घेवून येतो असे सांगून पंच नं. 1 याचेसह लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात परत आलो. ती वेळ 16.11 वा.ची होती. पो.नि.राऊत यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॅार्डर काढुन बंद केला. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला व पंच नंबर 1 यांना झालेली हकीकत विचारुन तसेच रेकॅार्डर मधील संभाषण ऐकुन क्लार्क हांगे यांनी माझ्याकडे 3,000/- रुपये लाचेची मागणी केलेची पो.नि.राऊत व दोन्ही पंचांची खात्री झाली. परंतु वेळेच्या अभावी पडताळणी पंचनाम्याची कारवाई नंतर करण्यात येईल असे पो.नि.राऊत यांनी मला सांगीतले.

त्यानंतर पो.नि.राऊत यांनी सापळा कारवाईचे नियोजन करुन मला 3,000/- रुपये हजर करण्यास सांगीतलेने मी 3000/- रुपये इतकी लाच रक्कम पो.नि.राऊत यांचेकडे हजर केली. पो.नि.राऊत यांनी सापळापुर्व व सापळा कारवाईची थोडक्यात माहीती मला व पंचांना सांगुन अॅथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहीती देवुन त्याचे प्रात्यक्षिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयातील पो.नि.राऊत यांचे कक्षात करुन दाखविले.

पो.नि.राऊत यांच्या सुचनेनुसार पथकातील पो.शि.येवले यांनी 3000/- रुपये लाचेच्या रकमेस अंथ्रासीन पावडर लावली व ती लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. मनुष्यबळाची कमतरता असलेने पो.शि.येवले यांना पुन्हा त्यांचे हात स्वच्छ धुवुन घेवुन सापळा पथकात सामील केले. सदरची सापळापुर्व कारवाई ला.प्र.वि.सातारा कार्यालयात पुर्ण करण्यात आली. पो.नि.राऊत यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकाला कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या आणि मला व पंच नंबर 1 यांना लाचेची रक्कम घेवुन लाचेची रक्कम क्लार्क हांगे यांना देण्यासाठी रवाना केले ती वेळ 16.41 वा.ची होती.

त्यानंतर मी व पंच नंबर 1 पायी चालत जिल्हा परिषद सातारा येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) कार्यालयात गेलो. त्यावेळी पो.नि.राऊत, पंच नं.2 व सापळा पथक असे शासकीय वाहनातून आमचे पाठोपाठ आले. व वाहनातून उतरुन कार्यालयाचे आवारात उभे राहिले. तेव्हा क्लार्क हांगे हे कार्यालयात हजर नसलेने मी व पंच नं.1 असे त्यांची कार्यालयाबाहेरील बाकडयावर बसुन वाट पाहत बसलो. थोडया वेळाने क्लार्क हांगे हे कार्यालयात त्यांचे कार्यासनावर आले. तेव्हा मी त्यांचेशी कामासंबंधाने चर्चा केली तेव्हा हांगे क्लार्क यांनी त्यांचे उजवे हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा करत ड्रॉवर उघडुन पैसे ड्रॉवर मध्ये टाका असे म्हणाले त्यावर मी माझ्या उजव्या हाताने शर्टच्या पुढील डावे बाजुच्या खिशात ठेवलेली 3000/- रुपये लाच रक्कम काढुन क्लार्क हांगे यांचेसमोर धरुन मोजुन घेताय का, मोजल आसत तर बर झाल असत असे म्हणाले त्यावर क्लार्क हांगे हे ड्रॉवर मध्ये टाका असे म्हणाले म्हणुन मी माझ्या हातातील लाच रक्कम क्लार्क हांगे यांचे समोरील लाकडी टेबलाचे उजव्या ड्रॉवर मध्ये ठेवली त्यावेळी क्लार्क हांगे यांनी त्यांचे उजवे हाताने सदरचा ड्रॉवर बंद केला. त्यानंतर मी जिल्हा परिषद सातारा येथील वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) कार्यालयाचे बाहेर आलो व मी सापळा पथकाला दिसेल अशा रितीने डाव्या हाताने दोन वेळा डोक्याचे केसावर हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा केला.

सदर इशारा पाहुन पो.नि.राऊत व पथक माझ्या जवळ येवुन माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर पो.नि.राऊत यांनी काढुन तो बंद केला व मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. ती वेळ 17.41 वा.ची होती. काही वेळाने पो. नि.राऊत यांनी मला कार्यालयात बोलावून माझी अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे पुढील डावे बाजूचे खिशाचे आतील बाजूस व कडांस ॲथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला कळविले की, क्लार्क हांगे यांना ताब्यात घेवून त्यांची कार्यालयातच तपासणी केली त्यावेळी क्लार्क हांगे यांचे टेबलचे उजव्या बाजूचे ड्रॉवरमध्ये ॲथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी क्लार्क हांगे यांना ताब्यात घेतले तसेच मी व पंच नं.1 असे पायी चालत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात दाखल झालो. त्यावेळी मला पो. नि.राऊत यांनी कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला कार्यालयात बोलावून घेवून पंचासमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यांनतर पो.नि.राऊत यांनी माझे व पंच नं.1 शिंदे यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला.त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा कार्यालयात बोलावून घेवून मला सदर हकीकत विचारली. सदर सविस्तर यशस्वी पंचनामा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सातारां येथे टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे.

तरी दिनांक 17/01/2024 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई मध्ये लोकसेवक हेमंत विठोबा हांगे, वय 35 वर्षे, पद - वरीष्ठ सहाय्यक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक), जिल्हा परिषद, ता. सातारा, जि.सातारा वर्ग - 3 रा. एनकुळ ता.खटाव जि.सातारा यांनी माझे भविष्य निर्वाह निधी खाते जिल्हा परिषद सातारा येथुन जिल्हा परिषद सांगली येथे वर्ग करण्यासाठी तडजोडीअंती 3000/-रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक), जिल्हा परिषद, ता. सातारा, जि.सातारा कार्यालयात दिनांक 17/01/2024 रोजी 17.40 वा चे सुमारास स्वत: स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील खबरी जबाब माझ्या सांगणेप्रमाणे टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहीला असुन तो बरोबर आहे.

समक्ष हा खबरी जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAHENDRA JAYVANT JAGTAP(I (Inspector)) / POBN78226

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MAHENDRA JAYVAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN78226

पा. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे